# Good Work Of Nagpur Rural Police

## पोलीस मुख्यालय येथे बीपीसीएलचे
## 'वैद्यकीय तपासणी शिबीर' संपन्न

नागपूर (ग्रामीण) जिल्हयातील कार्यरत असलेल्या ४५ वर्ष वयावरील पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्या वैद्यकीय तपासणीचे आयोजन भारत पेट्रोलियम कार्पो. लि. आणि रोटरी क्लब नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस मुख्यालय नागपूर (ग्रामीण), टेकानाका येथे दिनांक १२/०२/२०१७ रोजी सकाळी ०७.०० वा. ते १२.०० वा. चे दरम्यान करण्यात आले होते.

पोलीस विभागातील ४५ वर्ष वयाच्यावर असलेले पोलीस शिपाई ते उपअधिक्षक पदाच्या अधिकाऱ्यांची वैद्यकीय तपासणी यावेळी करण्यात आली. या वैद्यकीय तपासणीमध्ये रक्तगट, ब्लडशुगर, डायबीटीज, लीपीड प्रोफाईल, लीव्हर फंक्शन, बीएमआय, जनरल फिजीशीयन यांचे कडुन इतरही तपासण्या करण्यात आल्या. बदलत्या जीवनशैलीमुळे प्रत्येकाच्या आरोग्याच्या समस्या वाढत आहे. कामाच्या व्यस्ततेमुळे पोलीसांचे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष दिसुन येते आणि या कामाच्या ताणाचा परिणाम पोलीसांच्या आरोग्यावर दिसुन येतो. वाढत्या वयाबरोबर आरोग्याच्या समस्याही वाढत आहे. यामुळे बीपीसीएल आणि रोटरी क्लब याच्या वतीने या आरोग्य तपासणीचे आयोजन करण्यात आले होते.

रोटरी क्लबचे श्री. चंदु शहानी, श्रीमती मंजु शहानी, रोटरी क्लबचे सेक्रेटरी श्री. मनिष भाटी, श्री. सायरस आणि बीपीसीएलचे प्रादेशिक प्रबंधक श्री. समीर डांगे यांचाही पुष्पगुच्छ देवुन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. कैलास गावडे यांनी केले. तर संचालन आणि आभार प्रदर्शन पोलीस निरीक्षक श्री. विलास वांदीले यांनी केले. या वैद्यकीय तपासणीला डॉ. जेरेस्टीन वॉचमेकर, डॉ. संजय सुद, डॉ. शिला मुंदडा, अर्नेजा हॉस्पीटलचे समीर रेटर, तनुजा राखडे, हेमंत महाडीक तसेच ध्रुव पॅथॉलॉजीचे डॉ. माधवी देशमुख, नेहा रहांगदडे, श्वेता, प्रवीण, कैलाश, खान पॅथॉलॉजीचे नितीन महातो, संजय साहु, जितेंद्र गुलानी, मेयो हॉस्पीटलचे श्रेया, आशा, मानसी इत्यादी स्टाफ हजर होता. तसेच पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी बहुसंख्येत उपस्थित

होते. पोलीस मुख्यालयाचे राखीव पोलीस निरीक्षक श्री. सतिश रिंगणे, मानवी संसाधन शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. मनिष दिवटे, सफौ. हिवरकर, पोहवा. सय्यद, पोशि. डार्विन शेंडे, मपोशि. लिना लोंदे यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये उत्तम सहकार्य केले. तसेच या वैद्यकीय तपासणी शिबीरामध्ये मध्ये एकुण ४७० व्यक्तींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.









नोंदणी
Police Medical Camp


PCRA
जाँचिए और भरिए